आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

५ एप्रिल २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्जांची छाननी पूर्ण, ८ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार

- काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात युवकांना रोजगार, बेरोजगारी भत्ता, गरीब महिलांना अर्थसहाय्य, शेतकऱ्यांना कर्जमाफी, पिकाला हमीभाव, जाति आधारित जनगणनेचं आश्वासन

- रिझर्व्ह बँकेच्या, नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या पतधोरण आढाव्यात व्याजदर जैसे थे /युपीआयद्वारे पैसे जमा करण्यासाठी लवकरच परवानगी

- माथाडी कामगारांच्या प्रश्नामुळे नाशिक जिल्ह्यातल्या बाजार समित्यांमध्ये व्यवहार ठप्प

**आणि**

- नाशिक दिंडोरी रस्त्यावर झालेल्या अपघातात ५ जणांचा मृत्यू, ३ जण गंभीर जखमी

**<><><><><><>**

लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दाखल झालेल्या अर्जांची छाननी आज झाली.

**बुलडाणा** मतदारसंघासाठी उमेदवारी अर्जांच्या छाननीनंतर ४ उमेदवारांचे अर्ज बाद झाले आहेत. बुलढाणा मतदारसंघातले भाजपाचे विजयराज शिंदे आणि शिवसेनेचे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांचे अर्ज बाद झाले आहेत.

**नांदेडमध्ये** लोकसभा निवडणुकीसाठी झालेल्या छाननीमध्ये ६६ उमेदवार पात्र तर ८ उमेदवार अपात्र ठरले आहेत. कालपर्यंत ७४ उमेदवारांनी ९२ अर्ज दाखल केले होते.

**अकोला** मतदारसंघासाठी कालपर्यंत २८ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. छाननीनंतर १७ उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्यात आले.

**परभणी** मतदारसंघासाठी ४२ उमेदवारांनी ६५ उमेदवारी अर्ज दाखल केले. आज झालेल्या छाननीत एक अर्ज अवैध ठरला आहे.

**हिंगोली** मतदारसंघात ४८ उमेदवारांचे अर्ज वैध तर ७ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले आहेत.

पात्र उमेदवारांना ८ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे.

या टप्प्यात महाराष्ट्रात २६ एप्रिलला आठ मतदारसंघात मतदान होणार आहे.

**<><><><><><>**

गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात देसाईगंज आणि चामोर्शी इथं आज ज्येष्ठ भाजपा नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी प्रचारसभा घेतल्या. भाजपा उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारार्थ आयोजित या सभांमधे गडकरी यांनी गडचिरोली जिल्ह्यातल्या विकासकामांची माहिती दिली. गडचिरोली जिल्ह्यात चांगले रस्ते झाल्यानं तिथं उद्योग सुरु होत आहेत, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी मिळणार असून, येत्या दहा वर्षांत हा जिल्हा राज्यातला सर्वांत श्रीमंत जिल्हा असेल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

दोन्ही ठिकाणच्या सभांना राज्याचे अन्न आणि औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम, आणि भाजपा पदाधिकारी, नेते उपस्थित होते.

<><><><><>

गेल्या दहा वर्षांत सरकारनं सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज राजस्थानमध्ये शेखावती भागात चुरू इथं प्रचार सभेला संबोधित केलं. गेल्या दहा वर्षांत विकसित भारताचा पाया तयार झाला असल्याचं त्यांनी म्हटलं. सत्तेत आल्यानंतर सरकारनं प्रामाणिकपणे काम केले असून देश झपाट्यानं प्रगती करत असल्याचं त्यांनी म्हटलं.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यात ५ न्याय आणि २५ गॅरंटी या शीर्षकाखाली युवकांना रोजगार, न मिळाल्यास वार्षिक १ लाख रुपये बेरोजगारी भत्ता, गरीब महिलांना वार्षिक १ लाख रुपये अर्थसहाय्य, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि पिकाला हमीभाव, मनरेगामार्फत किमान ४०० रुपये दर रोज मजुरी, सामाजिक आणि आर्थिक समानतेसाठी जात आधारित जनगणना, संवैधानिक संस्थांचं जतन, इत्यादी मुद्द्यांचा या जाहीरनाम्यात समावेश आहे.

भाजपाचा जाहिरनामा आज प्रसिद्ध होणार आहे. केंद्रीयमंत्री आणि ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली नेमलेली समिती हा जाहीरनामा तयार करत आहे.

भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीनं काल नवी दिल्लीत आपला निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केला.

<><><><><>

मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी ग्रामीण आणि शहरी भागासाठी वेगवेगळा कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिले आहेत. मतदानाचं प्रमाण अत्यल्प असलेल्या भागातल्या महापालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक त्यांनी आज नवी दिल्लीत घेतली. या बैठकीमध्ये राज्यातल्या मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे, पालिकांचे आयुक्त सहभागी झाले. लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी 'मतदानाच्या अत्यल्प प्रमाणाबाबत परिषद आयोजित केली होती. मतदान करण्याचा अभिमान वाटावा अशा प्रकारे जागृती करण्याचं आवाहन कुमार यांनी केलं. मागच्या निवडणुकीत कमी मतदान झालेले २१५ ग्रामीण आणि ५१ शहरी लोकसभा मतदारसंघांमध्ये मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><><>

भारतीय जनता पक्ष उदया ६ एप्रिल हा पक्षाचा स्थापना दिवस विविध उपक्रमाद्वारे राज्यात साजरा करणार आहे. यामध्ये बूथ यात्रा, मोदी ॲप द्वारे भाजप सदस्यत्व, ११ एप्रिल रोजी महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यकर्त्यांच्या टिफिन बैठकीतून अभिवादन, १४ एप्रिलला डॉ .बाबासाहेब आंबेडकरांची जयंती, अशा उपक्रमाद्वारे, तसंच भाजपा आणि जनसंघाच्या जडणघडणीत हातभार लावणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार देखील केला जाणार आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सभा चंद्रपूरला ८ एप्रिल रोजी, तर रामटेक लोकसभा मतदार संघात कन्हान इथं १० एप्रिलला होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यात १४ सभांची विनंती केली असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं सलग सातव्यांदा रेपो दर साडे सहा टक्के ठेवला आहे. बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या पतधोरण समितीच्या आढावा बैठकीत ही माहिती दिली. रेपो दरात कोणताही बदल केला नसल्यानं गृहकर्ज महाग होणार नाही. चलनफुगवटा दरातली स्थिरता आणि आर्थिक घडामोडी लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचं दास यांनी वार्ताहरांना सांगितलं.

रिझर्व्ह बँकेनं २०२४- २५ या आर्थिक वर्षासाठी सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर सात टक्के तर किरकोळ महागाई दर साडे चार टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. रिझर्व्ह बँकेनं फेब्रुवारी २०२३मध्ये रेपो दर साडे सहा टक्के केला होता.

**<><><><><><>**

बँकेत रक्कम जमा करण्यासाठीच्या यंत्रांमधे युपीआयचा वापर करून  पैसे जमा करण्यासाठी रिझर्व्ह बँक लवकरच परवानगी देणार आहे. या सुविधेमुळे ग्राहकांची सोय होईल आणि बँकामध्ये पैसे हाताळण्याची प्रकिया अधिक कार्यक्षम होईल असं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज सांगितलं.

**<><><><><><>**

माथाडी कामगारांच्या मागण्यांमुळे नाशिक जिल्ह्यातल्या सर्वच बाजार समित्यांमध्ये कांद्याचे तसंच इतर लिलाव होऊ शकले नाहीत. लागोपाठ दोन

दिवसापासून जिल्ह्यातल्या बाजार समितीचे व्यवहार ठप्प पडले आहे. माथाडी-मापारी कामगारांच्या हमाली, तोलाई आणि वाराई कपातीसह लेव्हीसंदर्भात सर्वमान्य तोडगा निघेपर्यंत माथाडी - मापारी कामगार दैनंदीन वजनमापाच्या कामकाजात सहभागी होणार नसल्याचं माथाडी-मापारी कामगारांनी पत्रान्वये बाजार समितीला कळवलं होतं. त्यामुळे लासलगाव, नाशिक, निफाड, सिन्नर, चांदवड, मालेगाव यासह इतर बाजार समित्यांमध्ये काल कोणत्याही प्रकारच्या मालाचे लिलाव शेतकऱ्यांनी आणलेला कांदा भाजीपाला परत पाठवून देण्यात आला.

**<><><><><><>**

नाशिक दिंडोरी रस्त्यावर ढकांबे गावाजवळ आज दुपारी झालेल्या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला तर ३ जण गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीनं नाशिकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं. बोलेरो गाडीचं मागचं चाक फुटल्यानं चालकाचं नियंत्रण सुटलं आणि गाडी झाडावर आदळली. त्याचवेळी नाशिकहून दिंडोरीकडे जाणारी दुचाकीही या गाडीवर आदळली. बोलेरोत वणीहून दर्शन घेऊन घरी चाललेले भाविक होते.

**<><><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबादचा सामना चेन्नई सुपर किंग्जशी होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><><>**

महाराष्ट्रात येत्या दोन दिवसात उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. महाराष्ट्रात पुढचे चार दिवस विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्याची शक्यता आहे.  येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. या ठिकाणी वादळ, सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका पाऊस पडेल अशी शक्यता आहे. विदर्भात बहुतांश ठिकाणी, मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान चंद्रपूर इथं ४२ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदलं गेलं. सोलापूर शहर आणि  जिल्ह्यात उन्हाची तीव्रता वाढत चालली असून गतवर्षीपेक्षा यंदा तपमानात  ४ पूर्णांक १ दशांश अंश सेल्सिअसनं वाढ झाली आहे. यंदा एप्रिल महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात तपमानाने उच्चांक गाठला हे. त्यामुळे यंदाच्या उन्हाळ्यात सार्वाधिक तपमानाची शुक्रवारी नोंद झाली आहे.

**//<><><><><><>//**